पुढारी

# 'सेट'साठी ७ हजार ५६९ विद्यार्थी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य पात्रता परीक्षा (सेट) शिवाजी विद्यापीठ केंद्रांतर्गत १९ उपकेंद्रांवर सुरळीत पार पडली. ७ हजार ५६९ विद्यार्थी परीक्षेला बसले, तर १ हजार ९४३ विद्यार्थी गैरहजर होते.

पुणे विद्यापीठअंतर्गत रविवारी 'सेट'ची ४० विविध विषयांसाठी परीक्षा झाली. परीक्षेसाठी ९ हजार ५१२ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. पहिला पेपर सकाळी १० ते ११ यावेळेत, तर दुसरा पेपर ११.३० ते १.३० दरम्यान झाला. शहरातील १९ केंद्रांसाठी सोलापूर, पुणे आणि मुंबई विद्यापीठातून १९ निरीक्षक आले होते.

दिल्लीतील यूजीसी सेट केंद्राचे प्रा. संजीव जैन यांनी १९ परीक्षा केंद्रांना भेट देऊन पाहणी केली, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ सेट विभाग समन्वयक डॉ. पी. व्ही. अनभुले यांनी दिली.

Kolhapur Edition
24 Jun, 2019 Page No. 7
Powered by : erelego.com

लोकमत

## वर्षाचा कोर्स : प्रशिक्षण देणारे शिवाजी विद्यापीठ देशातील एकमेव

# ‘रेशीम’चे धडे गिरवा, नोकरीही मिळवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रेशीम शेतीचे शास्त्रीय प्रशिक्षण घेऊन उत्पन्नात वाढ करणाऱ्या शेतकऱ्यांना आता नोकरीचीही संधी चालून आली आहे. रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना रेशीम तांत्रिक सहायक या पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तशी जाहिरात प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

रेशीमशास्त्रावर एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात दोन वर्षांपासून सुरु आहे. केवळ सातवी पास आणि स्वत: रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रवेश देऊन अभ्यासक्रम चालविणारे विद्यापीठ देशातील एकमेव ठरले आहे.

प्राचीन काळापासून देशात रेशीम शेती केली जात असल्याने सिल्क रुट म्हणून संबोधल्या जाणाऱ्या प्राचीन प्रांतात कोल्हापूरचाही समावेश होता. या शेतीला शास्त्रीय आधार आणि अत्याधुनिकतेची जोड दिली जात नव्हती. परिणामी धागाही कमी मिळत असल्याने या शेतीकडे कुणी फारसे गांभीर्याने पाहत नव्हते. ऊस आणि भाताचेच प्राबल्य असणाऱ्या या भागात लोकांना रेशीम शेतीकडे

## नोकरीस ४० पदविकाधारक पात्र

स्वत:चे उत्पन्न वाढविण्याबरोबरच इतरांना ज्ञान देऊन त्यांचेही उत्पन्न वाढविण्यासाठी म्हणून राज्य सरकारने या वर्षीपासून ‘रेशीम तांत्रिक साहाय्यक’ ही पदनिर्मिती केली आहे. त्याची गेल्या १८ जूनला जाहिरातही प्रसिद्धीस दिली आहे. राज्यभरात ५० जागा भरावयाच्या आहेत. हा अभ्यासक्रम फक्त कोल्हापुरातच शिकविला जात असल्याने साहजिकच विद्यापीठात पदविका घेतलेल्या ४० जणांना नोकरी मिळणार आहे. या सहायकांमार्फत रेशीम शेतीचा विस्तार करण्याचे शासनाचे धोरण आहे.



- **अभ्यासक्रमाचे ठिकाण :** प्राणिशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
- **पात्रता :** सातवी पास, रेशीम शेती करणारे शेतकरी
- **वयोमर्यादा :** नाही.
- **कालावधी :** १ वर्ष, ७५ मार्कांचे ४ पेपर.

चळविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागात अध्यापनाचे काम करणारे डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रयत्न सुरु केले. त्यांच्याच पुढाकाराने २०१७ मध्ये ‘रेशीम शेती व्यवस्थापन’ नावाने एक वर्ष कालावधीचा पदविका अभ्यासक्रम सुरु केला. अशा प्रकारचा अभ्यासक्रम देशात पहिलाच असल्याने त्याची रूपरेषा ठरविण्यापासून सुरुवात झाली.

येथे प्रवेश घ्यायचा तर नवीन विद्यार्थी घेण्यापेक्षा रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाच निवडण्याचे ठरले. ७५ मार्कांचे चार पेपर ठेवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे दहा हजार रुपये फी भरुन येथे प्रवेश घेण्यासाठी शेतकरी उत्सुक असतात. येथे येण्यासाठी उत्पन्न दुप्पट करून देणे हा पहिला उद्देश असतो.

हा अभ्यासक्रम शिकून गेलेल्यांनी उत्पन्नात चौपटीने वाढ केली आहे. आतापर्यंत ४० जणांनी पदविका प्राप्त केली आहे. केवळ सातवी पास शैक्षणिक पात्रता ठेवली आहे. त्याच्यापूर्वी ज्ञानाला आधुनिकतेची व शास्त्रीयतेची जोड देण्याचे काम या अभ्यासक्रमाने केले.